# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

www.eprabhat.net
प्रभात पुणे, शनिवार, दि. २८ जून २०१४

# राजगुरूनगरात जनजागृती रॅली

## अंमलीपदार्थ विरोधदिन : विविध कार्यक्रमांचे आयोजन

राजगुरूनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - राजगुरूनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व खेड पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अंमलीपदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली, यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



**राजगुरूनगर : येथे जागतिक अंमलीपदार्थ विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली.**

यावेळी विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ विरोधी घोषणा दिल्या. महाविद्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमात प्रा. सुभाष साळुंके यांचे 'अंमलीपदार्थांचे दुष्परिणाम' या विषयावर व्याख्यान झाले. यावर बोलताना त्यांनी देशाचा आधारस्तंभ असणारी तरुणाई व्यसनाधीन होत असून त्यातून परावृत्त होण्यासाठी युवा पिढीला केवळ धडे देऊन भागणार नाही; तर त्यासाठी शिक्षण, संस्कार, मार्गदर्शन, समुपदेशन देण्याची व चंगळवादामुळे आलेली अंधानुकरणाची वृत्ती टाळण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. अंमली पदार्थांमुळे होणाऱ्या सामाजिक, शारीरिक, आर्थिक, कौटुंबिक दुष्परिणामांबद्दल त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास इंगवले, पोलीस उपनिरीक्षक मुख्तार शेख, दिलीप महाडिक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस. बी. पाटील, उपप्राचार्य सी. व्ही. खेडकर, एम. बी. भालेराव, दिलीप गायकवाड, सी. आर.वडेकर, आर. एस. सातपुते, प्रा. डी. बी. सुकाळे, प्रा. जी. बी. शिंदे, प्रा. व्ही. बी. लडकत, प्रा. एस. एन. टाकळकर उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख